


बुधवार
२७
मे २०२६

वर्ष १९ वे
अंक - १२७
पाने - ६
किंमत - ४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

www.yuvavarta.com
dailyyuvavarta@gmail.com

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.) मोबा. ९८२२०३९४६०

रसिक होऊ दे दंग, चढु दे रंग, असा खेळाला।
साता जन्माची, देवा पुन्याई, लागु दे आज पनाला।
हात जोडतो, आज आम्हाला दान तुझा दे संग।
नटरंग उभा, ललकारी नभा, स्वरताल जाहले दंग!



# सोंगाड्या 'पद्मश्री'ने सन्मानित

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेरचे सुपुत्र आणि तमाशा लोककलेसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे ज्येष्ठ कलावंत सोंगाड्या रघुवीर खेडकर यांचा सोमवारी (दि. २५) दिल्लीतील राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रतिष्ठित पद्मश्री पुरस्काराने गौरव करण्यात आला. या सोहळ्यास उपराष्ट्रपती, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लोकनाट्य तमाशा क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ योगदानाची, लोककलेचे जतन आणि संवर्धनासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. संगमनेरच्या मातीत जन्मलेल्या रघुवीर खेडकर यांनी आपले वडील तुकाराम खेडकर आणि आई कांताबाई सातारकर यांच्याकडून लाभलेला लोककलेचा वारसा केवळ पुढे नेला नाही, तर आपल्या अभिनय, विनोद आणि सोंगाड्याच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीतून या कलेवर स्वतःची वेगळी छाप उमटवली.

गेल्या चार दशकांहून अधिक काळ ते तमाशा रंगभूमीवर कार्यरत असून आई कांताबाई सातारकर यांनी स्वबळावर सुरू केलेला तमाशा फड त्यांनी आजही यशस्वीपणे सांभाळला आहे. ते महाराष्ट्र राज्य ढोलकी फड तमाशा संघटनेचे अध्यक्ष असून तमाशा फड मालक आणि कलाकार म्हणूनही त्यांची ओळख आहे. विशेष म्हणजे, सोंगाड्याच्या पारंपरिक वेशभूषेत रघुवीर खेडकर यांनी पद्मश्री पुरस्कार स्वीकारताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. हा क्षण केवळ तमाशा क्षेत्रासाठीच नव्हे तर संगमनेरकरांसाठीही अभिमानाचा ठरला.



आपल्या भावना व्यक्त करताना रघुवीर खेडकर म्हणाले, जन्म झाल्यानंतर अवघ्या पाचव्या दिवशी छोट्या पात्रातून रंगमंचावर आलो. बघता बघता ४५ वर्षे निघून गेली आणि अजूनही तमाशा लोककलेची सेवा करत आहे. आई नेहमी सांगायची, 'लोक दुःख विसरण्यासाठी येतात, त्यामुळे आपले दुःख विसरून त्यांना हसवायचे.' तिचे शब्द आजही प्रेरणा देतात. दुःखातही लोकांना हसवत राहिलो, त्याचेच हे फळ आहे. (पान ४ वर)

**स्वर्गीय कांताबाई सातारकर यांचा समृद्ध वारसा रघु भाऊ यांनी जोपासला आहे. तमाशा ही जिवंत कला असून या लोककलेसाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. सोशल मीडियाच्या जमान्यांमध्ये ही लोककला लोप पावते की काय अशी भीती असताना या जिवंत लोककलेला लोकमान्यता मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे. याचबरोबर महाराष्ट्र तमाशा मालक मंडळाचे ते अध्यक्ष असून तमाशा कलावंतांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला आहे. त्यांचा हा सन्मान संगमनेरकर म्हणून अत्यंत अभिमानाचा क्षण सर्वजण अनुभवत असून अहिल्यानगर जिल्ह्याला मिळालेला हा मानाचा पुरस्कार आहे. रघुवीर खेडकर यांच्या निमित्ताने तमाशा क्षेत्रातील एका सच्चा कलावंतांचा गौरव झाला.**

**बाळासाहेब थोरात**
**माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य**



# तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाचा पदभार स्वीकारला!

## सरकारने पदावनती केल्याची मुंढेची भावना



मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबई- धडाडीचे, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून राज्यात नावलौकीक असलेले तुकाराम मुंढे अखेर आठवडाभराने अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारण्यास राजी झाले आहेत. सोमवारी दुपारी ११ वाजता मुंढे यांनी वांद्रे- कुर्ला संकुलातील अन्न व औषध प्रशासनाच्या राज्य मुख्यालयात आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारला.

मुंढे यांची आठ दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्तपदी नियुक्ती झाली होती. त्यापूर्वी त्यांची दिव्यांग सक्षमीकरण विभागातून तडकाफडकी उचलबांगडी केल्यानंतर मुंढे यांना गेले दीड महिना मुंढेंना पदाच्या प्रतीक्षेत ठेवले होते. पसंतीच्या अधिकार्यांकडे दोनदोन खाती आणि मुंढे यांना मात्र घरी बसवल्याने समाज माध्यमांमध्ये चर्चा होऊ लागली होती. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या विभागात मुंढे यांचे बळेबळे पुनर्वसन करण्यात आले आहे.

अन्न व प्रशासन आयुक्तपद हे भारतीय प्रशासन सेवेतील नवख्या अधिकाऱ्यांकडे किंवा बढतीने आयएएस झालेल्या अधिकाऱ्यांना दिले जाते. मुंढे यांचा अनुभव २० वर्षांचा असताना त्यांची या सामान्य पदावर बोळवण करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत होते. अन्न व औषध प्रशासनाचे सचिव धीरज कुमार आहेत. ते मुंढे यांच्या तुकडीचे अधिकारी आहेत. त्यांना मुंढे कसे रिपोर्ट करणार म्हणून या पदाचा कार्यभार पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांच्याकडे देण्यात आला.


मुंढे या सर्व खेळीने नाराज झाले. त्यामुळे त्यांनी आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारण्यास नकार दिला. दिव्यांग सक्षमीकरण विभागातून सहा महिन्यात मुंढे यांची उचलबांगडी करण्यात आली. त्याला कारण राजकीय नेत्यांच्या बोगस दिव्यांग संस्था आणि राज्य शासनात दिव्यांग बनावट प्रमाणपत्रावर नोकऱ्या पटकावलेले अधिकारी यांच्यावर मुंढे यांनी कठोर कारवाईचा बडगा उगारला होता. मुंढे यांचे समाज माध्यमांवर लाखो पाठीराखे आहेत. मुंढे यांच्या बदलीनंतर समाज माध्यमांवर सरकारवर टीका झाली होती.

मुंढे यांच्या २० वर्षांच्या कालावधीत २५ बदल्या झाल्या आहेत. आयएएस अधिकाऱ्याची बदली मुख्यमंत्र्यांच्या सहीशिवाय होत नाही. मुंढे यांना आपल्या विभागाचे सचिवपद देण्यास बहुतांश मंत्र्यांचा विरोध आहे. ज्या मंत्र्यांनी दिव्यांग सक्षमीकरण विभाग स्थापन करण्यास पुढाकार घेतला होता, त्यानांच मुंढे नकोसे झाले होते. त्यामुळे मुंढे यांना सहा महिन्यात बदलीस सामोरे जावे लागले. मंत्री, आमदार, अधिकारी आणि ठेकेदार यांचे मंत्रालयात साटेलोटे आहे. या लॉबीच्या विरोधात गेल्यास प्रामाणिक अधिकाऱ्यांना बदलीची शिक्षा दिली जाते. मुंढे त्याचेच बळी ठरलेले अधिकारी आहेत.


Happy Birthday



मा.सुशांत सातपुते
मुक्त पत्रकार



मा. सुमतीलाल भंडारी
भंडारी क्लॉथ स्टोअर्सचे संचालक



मा. भुपेश भळगट
संचालक, मनचंदा ट्रेडींग कंपनी

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता


# आठवड्यातून फक्त 3 दिवसच भरणार शाळा ?




मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यामध्ये जाणवणाऱ्या इंधन टंचाईच्या संकटामुळे उद्योग धंदे आणि शेतीची कामांना ब्रेक लागलाय. या इंधन टंचाईमुळे शालेय वाहतूक व्यवस्था मोठ्या अडचणीत सापडली आहे. नव्या शैक्षणिक वर्षाची तयारी सुरू असतानाच डिझेल आणि पेट्रोलच्या दरांनी डोकेदुखी वाढवली आहे, याचा थेट परिणाम आता शाळांच्या कामकाजावर होण्याची शक्यता निर्माण झालीय. इंधन टंचाई आणि वाढत्या खर्चाचा मेळ घालण्यासाठी मुंबईतील स्कूल बस ओनर्स असोसिएशनने सरकारकडे एक मोठी मागणी केली आहे.

राज्यातील वाढत्या इंधन दरवाढीमुळे स्कुल बस मालकांवर मोठे संकट ओढावले आहे. पुढील महिन्यात राज्यभरात शाळा सुरु होणार आहेत. मात्र, पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढल्याने त्याच दरात स्कुल बसची सेवा पुरवणे आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही. त्यामुळे एकाच सत्रात शाळा सुरु ठेवाव्यात, अशी मागणी स्कुल बस संघटनेकडून करण्यात आली आहे. आठवड्यातून तीन दिवसच शाळा भरवा आणि दोन दिवस ऑनलाइन वर्ग सुरू ठेवा, असे स्कुल बस संघटनेचे म्हणणे आहे. शाळा सुरू होण्याआधी एक जूनपर्यंत राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी विनंती स्कूलबस मालकांकडून करण्यात आली आहे. पेट्रोल आणि डिझेलचे वाढते भाव पाहता राज्यातील स्कूल अँड कंपनी बस ओनर्स असोसिएशनने इंधनदरवाढीनंतर शाळा सुरू होण्यापूर्वीच बस सेवेचे शुल्क वाढवण्याचे संकेत दिले आहेत. सरकारने स्कूलबस क्षेत्राला तातडीने दिलासा देत अनुदान किंवा सवलती द्याव्यात, अशी मागणी संघटनेने केली आहे. यावर आता राज्य सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

गेल्या दहा दिवसांमध्ये पेट्रोल आणि डिझेल दरात चारवेळा वाढ झाली आहे. सोमवारी देशभरात चौथ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाली. त्यानुसार आता पेट्रोलचे दर २.६१ रुपयांनी आणि डिझेलच्या दरात २.१७ रुपयांनी वाढ झाली आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सर्वात आधी वाढ झाली होती. त्यानंतर दहा दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर सातत्याने वाढत गेले होते. गेल्या दहा दिवसांमध्ये पेट्रोलच्या दरात एकूण ७ रुपये ३८ पैशांची वाढ झाली आहे. तर डिझेलच्या दरात ७ रुपये ०९ पैशांची वाढ झाली आहे.

# शेतकरी कर्जमाफीला आचारसंहितेत सूट; केंद्रीय निवडणूक आयोगाची मंजुरी



मुंबई (वृत्तसंस्था)

विधानपरिषद निवडणुकीमुळे आचारसंहितेच्या कचाट्यात अडकलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेला अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने ग्रीन सिग्नल दिला आहे. निवडणूक आयोगाने या योजनेच्या अंमलबजावणीला आचारसंहितेतून विशेष सूट दिली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली ही महत्त्वाकांक्षी कर्जमाफी आता ३० जूनपूर्वीच पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ऐन पेरणीच्या तोंडावर मिळालेल्या या मंजुरीमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहेमहाराष्ट्र विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू असून १८ जून रोजी मतदान होणार आहे. राज्यात आचारसंहिता लागू असल्याने या काळात कर्जमाफीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करता येतील का, बाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, निवडणूक आयोगाच्या मंजुरीनंतर आता या योजनेच्या अंमलबजावणीचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे.

सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आर्थिक अडचणीत सापडलेल्या आणि बँकेचे कर्ज थकलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची संपूर्ण कर्जमाफी दिली जाणार आहे. तर दुसरीकडे, बँकेचे कर्ज प्रामाणिकपणे आणि नियमितपणे फेडणाऱ्या शेतकऱ्यांचाही सरकारने सन्मान केला आहे. अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहेशासकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सर्व पात्र शेतकरी लाभार्थ्यांची पडताळणी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून ३० जूनपूर्वी कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात (डीबीटीद्वारे) वर्ग केली जाईल. खरीप हंगामाची कामे सुरू असतानाच हा निधी हाती येणार असल्याने शेतकऱ्यांची पैशांची नड भागणार आहे. - गेल्या काही वर्षांत राज्यातील शेती क्षेत्र सातत्याने अस्मानी संकटांचा सामना करत आहे. कधी दुष्काळ, कधी अवकाळी पाऊस, तर कधी अतिवृष्टी आणि त्यातच वाढलेला उत्पादन खर्च यामुळे बळीराजाचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले होते. अशा गंभीर परिस्थितीत सरकारने घेतलेला कर्जमाफीचा निर्णय आणि आता त्याला मिळालेली निवडणूक आयोगाची मंजुरी ही शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने दिलासादायक ठरणार आहे.




# पेट्रोल-डिझेल पाठोपाठ सीएनजी दोन रुपयांनी महाग



मुंबई (वृत्तसंस्था)

पश्चिम आशियातील युद्धामुळे कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूच्या किंमतीमध्ये वाढ होत असून, त्याच्या झळा भारतालाही बसू लागल्या आहेत. पेट्रोल-डिझेलच्या किंमतीबरोबरच सीएनजी महागला आहे. मंगळवारी (२६ मे) सीएनजीचे नवी दर लागू झाले असून, गॅस दोन रुपयांनी महागला आहे. राजधानी दिल्लीमध्ये सीएनजीचे दर प्रति किलो ८१.०९ रुपयांवरून आता ८३.०९ रुपये इतके झाले आहेत. गेल्या काही दिवसात इंधनाच्या दरात चार वेळा वाढ झाली आहे. सीएनजीचे दरही वाढवण्यात आले आहेत. दिल्ली पाठोपाठ नोएडा आणि गाजियाबादमध्येही सीएनजीचे दर वाढले आहेत. या दोन्ही शहरांमध्ये सीएनजीचे दर प्रति किलो ८९.७० रुपयांवरून ९१.७० रुपये इतका झाले आहेत.टॅक्सी, रिक्षाचे भाडे वाढणार?पेट्रोल डिझेल आणि सीएनजीचे नवीन दर लागू झाले असल्याने आता महागाईच्या झळा सर्वसामान्यांना सोसाव्या लागत आहे. सीएनजीच्या दरवाढीमुळे टॅक्सी आणि कॅबकडून भाडेवाढ केली जाऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढीबरोबरच सीएनजीचे दरही वाढल्याने दिल्ली आणि मुंबईसह अनेक शहरांतील टॅक्सी, ऑटो चालकांकडून भाडेवाढ करण्याची मागणी केली गेली आहे. १० दिवसांत चौथ्यांदा सीएनजीच्या दरात वाढ१५ मे पासून आतापर्यंत चारवेळा सीएनजीचे दर वाढवण्यात आले आहे. दिल्लीत १० दिवसांच्या आत सीएनजीचे दर प्रति किलो ७७.०९ रुपयांवरून ८३.०९ रुपयांवर पोहोचले आहेत. १५ मे रोजी दिल्लीत सीएनजीचे दर २ रुपयांनी वाढवले गेले होते. दहा दिवसांत सीएनजी प्रति किलो ६ रुपयांनी महागला आहे.

# मराठीचा आग्रह कायम, १५ ऑगष्टनंतर मुदतवाढ नाही- परिवहन मंत्री

मुंबई - राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा सहज बोलता, समजता आणि दैनंदिन व्यवहारात प्रभावीपणे वापरता यावी यासाठी परिवहन विभागामार्फत व्यापक पक मराठी शिक्षण अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. मराठी भाषा शिकण्यासाठी १५ ऑगस्ट २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मराठी शिक्षण अभियानात रिक्षा-टॅक्सी संघटनांनी सक्रिय सहभाग घेऊन पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत राज्यातील विविध रिक्षा व टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी मराठी भाषा शिक्षण उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सरनाईक म्हणाले की, चालकांना व्यवहारिक मराठी आत्मसात करता यावी यासाठी दररोज चार तासांचे ऑफलाइन प्रशिक्षण दिले जाणार आहे. मराठी संभाषण कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर देण्यात येणार असून ऑनलाइन प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, डोंबिवली, नवी मुंबई, वसई विरार, पालघर आणि डहाणू या भागांत प्रारंभी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. तसेच कोकण मराठी साहित्य 'परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ आणि विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातूनही मराठी शिकविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सुमारे ४५०० शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यांना मानधन दिले जाणार आहे. शासनाकडून यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आल्याची माहितीही मंत्री सरनाईक यांनी दिली.

# आढळा खोऱ्याची पाणीतूट भरुन काढणार; मंत्री विखे



युवावार्ता (प्रतिनिधी)

बिताका धरणातील पाण्यातून आढळा धरणातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी जलसंपदा विभागाने ३०कोटी रुपयांची तरतूद केली असून, यासाठीच्या सर्व्हेक्षणाचे काम सुरू झाले असल्याची माहीती जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

उर्ध्व प्रवरा डावा कालव्यावरील काटनियामक आणि अतिवाहकाच्या पूर्ण झालेल्या कामाचा लोकार्पण सोहळा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. आ. अमोल खताळ, भाजपा मंडल अध्यक्ष श्रीकांत गोमासे, ज्येष्ठ नेते वसंत देशमुख, दिलीपराव शिंदे, आबासाहेब थोरात, वैभव लांडगे, जनार्दन आहेर, डॉ.सोमनाथ कानवडे या कार्यक्रमासाठी जावेद जागीरदार, रौफभाई शेख, वैभव लांडगे, अशोक कानवडे, हरीश चकोर, राजाराम लांडगे, तुषार वाकचौरे, संतोष डोंगरे, गोपीनाथ रुपवते, साहेबराव वलवे, शंकर वाळे, अमित धुळगंड, महेंद्र कोल्हे, भागवत कानवडे, रोहिदास साबळे, संतोष सुर्वे, कैलास आडवाई, सुनील देशमुख, संदेश देशमुख, वैभव नाईकवाडी, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल कवडे यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या कामासाठी चार कोटी ४६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. पाच महीन्यात काम पूर्ण झाले असून या प्रणालीमुळे जवळे कडलग वडगाव लांडगा व धांदरफळ बुद्रुक गावांना पाण्याचा लाभ मिळेल. धामोडी नाल्यावरील सात बंधारे भरले जातील शेतकर्यांना सिंचनाचा लाभ होईल.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, निळवंडे प्रकल्पाच्या पाण्याचा लाभ मिळवून देण्याचा शब्द मी दिला होता.तो आज पूर्ण होत असल्याचे समाधान आहे.यापुर्वी निळवंडेच्या विषयावरून फक्त आम्हाला बदनाम केले गेले. मात्र महायुती सरकारमुळे पहील्या सहवीस किलोमीटरच्या कालव्यांची काम मार्गी लागली.याचे सर्व श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्व.मधुकर पिचड यांचे आहे.

आढळा खोर्यातील पाण्याची तूट भरून काढायची असेल तर बिताका धरणातून पाणी आणण्याशिवाय पर्याय नाही.यासाठी सर्व्हेक्षण सुरू झाले असून २०लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.सर्व्हेक्षण पूर्ण होताच आढळा खोर्यातील कामाची सुरूवात करण्याची जलसंपदा विभागाची तयारी असून यासाठी ३०कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

मंत्री विखै पाटील यांनी सांगितले की,आज लोकार्पण होत असलेल्या कामाचा पाठपुरावा आ.अमोल खताळ यांनी सातत्याने केला.कामाची पूर्तता सुध्दा प्रवरेच्या माजी विद्यार्थ्याने केली त्यामुळेच प्रवरेशिवाय पर्याय नाही.या तांत्रिक कामामुळे शेती पीकाला मोठा फायदा होईल. या भागातील गावांना निळवंडे आणि आढळातील पाण्याचा दुहेरी लाभ मिळून देणार याची खात्री देवून मंत्री विखे यांनी सांगितले की महायुती सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे हे अनेक निर्णयातून दाखवून दिले आहे.

# विधानपरिषद निवडणुकीत 100 कोटींच्या व्यवहाराचा आरोप; - वडेट्टीवारांचा गौप्यस्फोट



युवावार्ता (प्रतिनिधी)

मुंबई - महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विदर्भातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेसचे काही नगरसेवक संपर्काबाहेर गेल्याची चर्चा सुरू असतानाच काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी केलेल्या एका मोठ्या विधानामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपूर आणि गडचिरोली परिसरातील ६० हून अधिक काँग्रेस नगरसेवक संपर्काबाहेर असून ते भाजपचे स्थानिक आमदार बंटी भांगडिया यांच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. यामुळे काँग्रेसमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून हा विजय वडेट्टीवार यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात होता.

दरम्यान, या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना विजय वडेट्टीवार यांनी मोठा दावा केला. आमच्याही संपर्कात भाजपचे १०० हून अधिक नगरसेवक आहेत. त्यांच्या पक्षातही अंतर्गत वाद आहेत आणि दुसरा गट आम्हाला मदत करण्यास तयार आहे, असे त्यांनी म्हटले. मात्र, संबंधित नगरसेवकांची नावे किंवा त्यांचा तपशील त्यांनी जाहीर केलेला नाही.

याचवेळी वडेट्टीवार यांनी निवडणुकीतील आर्थिक व्यवहारांबाबतही गंभीर आरोप केले. आमचा उमेदवार निश्चित नसल्यामुळे काही लोकांना टोकन म्हणून प्रत्येकी पाच-पाच लाख रुपये दिल्याची माहिती आहे. ही निवडणूक तब्बल १०० कोटी रुपयांची झाली आहे, असा दावा त्यांनी केला. तसेच, पक्षाच्या व्हीपचे उल्लंघन करणाऱ्या नगरसेवकांवर कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला. जे नगरसेवक पक्षविरोधी भूमिका घेतील किंवा व्हीप झुगारून जातील, त्यांच्यावर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले. दुसरीकडे, चंद्रपूर-गडचिरोली-वर्धा विधान परिषद मतदारसंघातून भाजपकडून अरुण लखानी यांना उमेदवारी दिली जाणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. अरुण लखानी हे खासदार सुप्रिया सुळे यांचे व्याही असल्याचे सांगितले जात आहे. नुकतीच सुप्रिया सुळे यांनी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याने या चर्चांना अधिक उधाण आले आहे.

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५




# श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूटमध्ये अध्यक्ष डॉ. पोखरकरांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर




बोटा
(युवावार्ता प्रतिनिधी)-
ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणाऱ्या श्री स्वामी समर्थ संस्थेचे संस्थापक व संचालक डॉ. शिवाजीराव पोखरकर यांच्या वाढदिवसानिमित्त श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट, माळवाडी (बोटा) येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजात रक्ताचा तुटवडा भासू नये, या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. शिवाजीराव पोखरकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव केला.

संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, डॉ. शिवाजीराव पोखरकर हे माझ्यासाठी केवळ वडील नसून प्रेरणास्थान आहेत. ग्रामीण भागातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य समर्पित केले. त्यांच्या प्रयत्नातून उभी राहिलेली 'श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट' ही संस्था ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवणारी ठरली आहे.

पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्ये, नाविन्यपूर्ण विचार आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव जोपासण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात डॉ. शिवाजीराव पोखरकर यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावरही प्रकाश टाकण्यात आला. अत्यंत सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डॉ. पोखरकर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाच्या बळावर यशाचे शिखर गाठले. त्यांनी १९७२ साली आयआयटी खडगपूर येथून एम.टेक व पीएच.डी. पदवी संपादन केली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे त्यांनी तब्बल २० वर्षे अधिष्ठाता (डीन) म्हणून कार्य केले. या काळात कृषी शिक्षण, संशोधन आणि शेतकरी-विद्यार्थी केंद्रित उपक्रमांना त्यांनी नवी दिशा दिली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळाले, तरच देशाचा खरा विकास होईल, या विचारातून त्यांनी बोटा येथे श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूटची स्थापना केली. आज या संस्थेत इंजिनिअरिंग, फार्मसी, एमबीए, एमसीए, बीसीएस, बीएससी आयटी, ग्री व डेअरी डिप्लोमा, पीजीडीएमएलटी, आयटीआय, बीबीए व बीसीए असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. शिवाजीराव पोखरकर यांनी सर्वांचे आभार मानत सांगितले की, ग्रामीण विद्यार्थ्यांना नोकरीसाठी शहरात भटकावे लागू नये, हेच माझे स्वप्न होते. आज मोठ्या कंपन्या स्वतः माळवाडीतील कॉलेजमध्ये येऊन विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी देत आहेत, हीच माझ्यासाठी सर्वात मोठी समाधानाची बाब आहे.


SUBSCRIBE TO DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
DAILY YUVAVARTA


# घुले यांच्या वक्तव्यामागे दुसराच बोलविता धनी - देशमुख

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
तालुक्यात सध्या राजकीय वातावरण तापले असून, विविध विषयांवरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर महायुतीचे बापूसाहेब देशमुख यांनी पांडुरंग घुले यांच्यावर टीका करताना, आमदार अमोल खताळ यांच्या विरोधातील वक्तव्यामागे दुसराच बोलविता धनी आहे, असा आरोप केला.

देशमुख म्हणाले की, आमदार होण्यापूर्वीपासूनच अमोल खताळ हे सामाजिक कार्यातून सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जात होते. अनेक अडचणीच्या काळात त्यांनी पांडुरंग घुले यांनाही वेळोवेळी मदत केली होती. तसेच, कारखान्याचे संचालक आणि व्हाईस चेअरमन हे पददेखील आमदार खताळ यांच्या पाठबळामुळे मिळाले, हे घुले खासगीत मान्य करतात. मात्र, आता त्यांना त्या गोष्टींचा विसर पडल्याचे दिसून येत आहे.

तुमची काही कामे असतील, तर ती सांगा. आमदार खताळ यांच्या माध्यमातून ती करून घेऊ, असेही ते म्हणाले.



विकासकामांच्या माध्यमातून आमदार खताळ यांनी सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे, काही जणांना आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी चुकीचे आरोप करण्याची वेळ आली आहे. पांडुरंग घुले यांच्या भूमिकेमागे दुसरीच राजकीय शक्ती कार्यरत असल्याचेही देशमुख यांनी सूचित केले.

# चार मुलींनी साजरा केला माजी प्राचार्य बारेकर यांचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा

राजूर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
समाजात आजही मुलगाच हवा ही मानसिकता काही प्रमाणात कायम असताना, माझ्या मुलीच माझा खरा आधार आहेत, हा विचार आयुष्यभर जपणारे माजी प्राचार्य मुरलीधर उर्फ अण्णा बारेकर यांच्या सहस्त्र चंद्रदर्शन सोहळ्याचा कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. त्यांच्या चारही मुलींनी एकत्र येत मातोश्री लॉन्स येथे हा सोहळा कृतज्ञतेच्या भावनेतून साजरा केला.

सत्यनिकेतन संस्थेच्या सर्वोदय विद्या मंदिरचे माजी प्राचार्य म्हणून कार्यरत राहिलेले मुरलीधर बारेकर यांनी आयुष्याची ८२ वर्षे पूर्ण केली आहेत. त्यांच्या सहचारिणी पुष्पा बारेकर उर्फ नानी यांच्या साथीने त्यांचे आयुष्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अण्णांना सुनीता गाडेकर, संगीता मांडवेकर, सोनाली भालेकर आणि स्वाती भालेकर या चार पदवीधर मुली आहेत. आपल्या आई-वडिलांप्रती असलेली अपार आत्मीयता आणि जिव्हाळा व्यक्त करत या चारही मुलींनी आपल्या



कुटुंबासह अण्णा-नानींचा सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा साजरा केला. जावई ज्ञानेश्वर, विठ्ठल, विवेक, संजय तसेच नातजावई विभव कशाळकर यांनीही अण्णा-नानींना आई-वडिलांप्रमाणेच सन्मान दिला आहे. त्यामुळे मुलगा नसल्याची खंत त्यांना कधीच जाणवली नाही.

कार्यक्रमात ८१ दिव्यांनी औक्षण करून मुलींनी आपल्या आई-वडिलांप्रती असलेले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली. मुलींच्या भावना व्यक्त होताच उपस्थितांचे डोळे पाणावले आणि वातावरण भावूक झाले.

या कार्यक्रमाला माजी प्राचार्य ठकाजी कानवडे, मिलिंद उमराणी, नंदकिशोर बेल्हेकर, भारती महाले, विलास नवले, प्राचार्या मंजुषा काळे, विद्यार्थी, पालक व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसंगी बोलताना प्राचार्या मंजुषा काळे म्हणाल्या, आजचा हा क्षण केवळ सहस्त्र चंद्रदर्शन सोहळा नसून एका महान व्यक्तिमत्त्वाला दिलेला मानाचा मुजरा आहे. आजच्या काळातही मुलगा-मुलगी असा भेद पाहायला मिळतो. मात्र, 'माझ्या चार मुलीच माझ्या मुलाची उणीव भरून काढतील, त्याच माझ्या वंशाचा दिवा आहेत,' हा सरांचा विचार समाजासाठी आदर्शवत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य किरण भागवत यांनी तर आभार सोनाली भालेकर यांनी मानले.

# वृंदावनचे कृषीदूत शेतकऱ्यांच्या बांधावर

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
बदलत्या काळानुसार आणि हवामानाच्या बदलानुसार कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार व्हावा, याकरिता वृंदावन कृषी महाविद्यालयाचे कृषीदूत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले आहेत. तालुक्यातील बोरबन, आंबी खालसा, साकुर, पिंपळगाव देपा या गावांमध्ये जाऊन त्यांनी शेतकऱ्यांना प्रगत कृषी तंत्रज्ञानाची माहिती दिली.

डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित वृंदावन कृषी महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांमार्फत 'कृषीदूत शेतकऱ्यांच्या दारी' हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये कृषी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमातून थेट त्यांच्या शेतात प्रगत तंत्रज्ञानाचे धडे मिळणार आहेत.

तालुक्यातील बोरबन, आंबी खालसा, साकुर, पिंपळगाव देपा या गावांमध्ये या कृषीदूतांनी प्रवेश केला असून, गावातील सरपंच, उपसरपंच, प्रगतशील शेतकरी तसेच तरुण शेतकरी वर्गाशी संवाद साधत शेतकऱ्यांना माती व पाणी परीक्षण, जमिनीचे आरोग्य सुधारणे, जल व्यवस्थापन, सिंचन पद्धती, सेंद्रिय शेती, कीड व रोग नियंत्रण याबाबत प्रात्यक्षिकांसह सविस्तर माहिती दिली.

कृषी क्षेत्रातील आर्थिक विकासाला गती देण्यासाठी दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, गृह उद्योग यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांची देखील कृषीदूतांनी शेतकऱ्यांना माहिती दिली. याबरोबरच, महिला सक्षमीकरणाबाबतही त्यांनी महिलांना मार्गदर्शन केले. शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील नव्या संधींबद्दल माहिती देतानाच कृषी क्षेत्राचे भविष्य उज्ज्वल असल्याचेही यावेळी सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रोहित उंबरकर आणि कृषी कार्यानुभव समन्वयक प्रा. डॉ. योगेश एखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वृंदावन कृषी महाविद्यालयाच्या कृषीदूतांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवलेल्या या प्रगत तंत्रज्ञानाचा कृषी विकासाला निश्चितच फायदा होईल, अशा भावना या गावांतील शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या.

# जगात दहशतवाद का बोकाळतोय?

दहशतवादाची शिकार झालेल्या बांधवांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्धस्त होतात. अनेक लोकांना प्राण गमवावे लागतात. एकूणच राष्ट्राची व शेवटी जागतिक सुरक्षितता व शांतता भंग पावते. आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी व अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न श्री एन. के. कुमार, से. नि. अध्यापक हे सदर लेखातून करत आहेत... संपादक.

दहशतवादाचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका देशाचा नाही. दहशतवाद जगात सर्वत्र वेगाने पसरत आहे. त्यामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. मे १९९१ मध्ये काँग्रेस पक्षाच्या प्रचारादरम्यान तामिळनाडू राज्यातील श्रीपेरंबुदुर येथे सभेला संबोधित करत असताना दहशतवाद्यांनी भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या घडवून आणली. या घटनेचे औचित्य साधून २१ मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळला जातो. याच दिवशी त्यांची पुण्यतिथी असते. हाच दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून संपूर्ण देशात व जगातही पाळला जातो. या देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान म्हणून त्यांनी सन १९८४ ते सन १९८९ पर्यंत काम पाहिले. संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित व्हावी व अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचावा, तसेच देशासाठी दहशतवाद विरोधात लढणाऱ्या हजारो सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करणे, भावी पिढीला मूलगामी प्रभावापासून वाचविणे, त्यांच्या मनामध्ये देशाच्या प्रगतीसाठी, संरक्षणासाठी जागरूकता निर्माण करणे, हे देखील या दिवसाचे उद्देश आहेत. या मानवनिर्मित उपद्रवी कृत्यांची जॉन क्रेटम यांनी अशी व्याख्या केली - आपल्या राजकीय मागण्या जबरदस्तीने मान्य करून घेण्यासाठी विशिष्ट समूहात आत्यंतिक भीती निर्माण करण्याच्या हेतूने एखादी व्यक्ती किंवा गट यांनी प्रस्थापित सत्तेच्या बाजूने किंवा विरोधात चालविलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय.



आज सर्व जगच दहशतीच्या छायेखाली सापडलेले असून, कोणत्या ठिकाणी कधी हल्ला होईल? याची सततची टांगती तलवार प्रत्येकाच्या डोक्यावर लटकत असते. कोणता मनुष्य आज सुरक्षित आहे, हे खात्रीपूर्वक सांगणे कठीण झालेले आहे. मुंबई, दिल्लीसारख्या मोठ्या शहरातील माणूस सकाळी घराबाहेर पडला, तर संध्याकाळी तो सुखरूप घरी परतेल का? याची खात्री देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. भारतामधील दहशतवादाचा विचार केला, तर अनेक वेळा दहशतवादी हल्ले झालेले आहेत. मग तो मुंबई लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्ब हल्ला असेल, सीएसटी रेल्वे स्टेशनवर तसेच हॉटेल ताज, हॉटेल ओबेरॉय येथील हल्ला असेल. या देशाचा मानबिंदू म्हणून ज्याकडे आदराने पाहिले जाते, त्या पवित्र संसदेवरदेखील अतिरेक्यांनी हल्ला केला. तसेच उरी वा पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांच्या गाड्यांच्या ताफ्यावर झालेला हल्ला असेल, असे वर्षानुवर्षे दहशतवादी प्रवृत्ती हल्ले करत आहे. जम्मू-काश्मीर येथे नियमित असे हल्ले होत आहेत. त्यामुळे हजारो निरपराध नागरिक, कर्तव्यावरील भारतीय सैनिक, पोलीस दल यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

विशेषतः दहशतवादाचे स्वरूप असे असू शकते - संघटित, नियोजित व हिंसात्मक कृती करणे, राजकीय हेतूने प्रेरित होणे, बळजबरी व धमक्या देण्यासाठी शस्त्रांचा वापर करणे, लक्ष्य हे निवडक आणि निश्चित असणे, लोकशाही विरोधी कृत्य घडविणे, मानवी हक्कांचा भंग करणे. याच गोष्टी स्थानिक ते वैश्विक स्वरूप धारण करू शकतात.

यास कारणीभूत काही ढोबळ कारणे अशी : १) आंतरराष्ट्रीय कारणे - राजनैतिक मार्गाने उद्दिष्टे साध्य होत नाहीत म्हणून शत्रू राष्ट्रावर मात करण्यासाठी दहशतवाद अंगीकारला जातो. मूलतत्त्ववादी व धार्मिक कट्टरवादी हे दहशत निर्माण करून आपल्या उद्दिष्टांचा व धार्मिक तत्त्वांचा अंगीकार करू इच्छितात. छोट्या राष्ट्रांना बड्या राष्ट्रांबरोबर युद्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने दहशतवादाचा मार्ग त्यांना फायदेशीर वाटतो. लष्करी सामर्थ्य वाढविण्यापेक्षा दहशतवादास पाठिंबा देणे सोपे असते. उदाहरणार्थ - पाकिस्तानचा काश्मीरमध्ये चालू असलेला सरकार पुरस्कृत दहशतवाद. वाढते नागरीकरण व शहरीकरण यामुळे होणारा त्रास. २) सामाजिक कारणे - बेकारी, सामाजिक असुरक्षिततेची भावना, सुसंवादाचा अभाव, दुसऱ्याबद्दल संकुचित वृत्ती व स्पर्धात्मक भावना ठेवणे. ३) आर्थिक कारणे - दारिद्र्य, लुटारू वृत्ती व पैशाची हाव, अमली पदार्थाची तस्करी, आर्थिक विषमता तसेच विकासातील विषमता, काळा पैसा आदी. ४) राजकीय कारणे - सत्ताकांक्षा, शासनाची उदासीन प्रवृत्ती व फुटीरवादी चळवळीस प्रोत्साहन, सरकारकडून अपेक्षाभंग, राजकीय बजबजपुरी इत्यादी. ५) तांत्रिक कारणे - अत्याधुनिक शस्त्रे व साधने यांची सहज उपलब्धता, आधुनिक दळणवळण सुविधा व प्रगत संदेशवहन सहज शक्य होणे आदी. ६) इतर कारणे - लोकशाही व्यवस्थेचा अभाव, असहिष्णुता, धार्मिक व वांशिक विद्वेष इत्यादी सांगता येतील.

या व अशा उपद्व्यापामुळे मानवास भोगावे लागणारे दुष्परिणाम असे - दहशतवादामुळे सामाजिक तसेच राष्ट्राच्या सुरक्षिततेची भावना धोक्यात येते. संरक्षणावरील खर्च वाढून राष्ट्राच्या विकासाची गती मंद होते. दहशतवादी कारवायांमुळे राष्ट्राच्या संपत्तीचे अतोनात नुकसान होते. राष्ट्राच्या विकासाकडे दुर्लक्ष होते. दहशतवादाची शिकार झालेल्या बांधवांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्धस्त होतात. अनेक लोकांना प्राण गमवावे लागतात. एकूणच राष्ट्राची व शेवटी जागतिक सुरक्षितता व शांतता भंग पावते.

आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी व अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या दहशतवादामुळेच संपूर्ण जगाची शांतता भंग पावली आहे. फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्येने देशाची फार मोठी आर्थिक हानी केलेली आहे. दहशतवाद व हिंसाचार याचे मूळ हे धार्मिक महत्त्वाकांक्षेत आहे. आपला धर्म हा सर्वात श्रेष्ठ आहे. त्या धर्माचा प्रचार व प्रसार व्हावा, हा यामागील सर्वात मोठा हेतू आहे. त्यासाठी अत्यंत विषारी आणि विखारी प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो. म्हणून दहशतवाद निर्माण करणारी देशभर पसरलेली केंद्रे संपवणे व धर्मांधतेला प्रोत्साहन देणाऱ्या संस्था, संघटनांची दुकाने बंद करणे आवश्यक आहे. झटपट श्रीमंती, वजनदारपणा, अधिकार व सत्ता हस्तगत लोलुपता याही गोष्टींना हाणून पाडणे आवश्यक राहील. यासाठी जनतेने जागरूक राहून वागले पाहिजे. जागतिक दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन सप्ताहनिमित्ताने...

**संकलन –**
**श्री एन. के. कुमार, से. नि. अध्यापक.**
**गडचिरोली, मोबा. – ७७७५०४१०८६**

# जिल्ह्यात गेल्यावर्षीपेक्षा समाधानकारक पाणी साठा

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
राज्यात उन्हाचा कडाका वाढत असतानाच अहिल्यानगर जिल्ह्यासाठी दिलासादायक वृत्त आहे. जिल्ह्यातील प्रमुख धरणांतील एकूण उपयुक्त पाणीसाठा सध्या १९.४४० टीएमसी इतका असून तो गतवर्षीच्या तुलनेत तब्बल ३ टीएमसीने अधिक आहे. रब्बी हंगाम संपून सध्या उन्हाळी हंगाम सुरू असल्याने, उपलब्ध पाणीसाठ्यामुळे शेती सिंचनासह पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भेडसावणार नाही, असा अंदाज आहे. परंतु, अलनिनोचा परिणाम, वाढते तापमान आणि पाण्याचे होणारे वेगाने बाष्पीभवन लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत जपून करावा, असे आवाहन जलसंपत्ती अभ्यासक तथा निवृत्त अभियंता हरिश्चंद्र चकोर यांनी केले आहे.

कडक उन्हाळयामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागांतील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत आटले आहेत. त्यामुळे प्रशासनाकडून टँकरने पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र, यंदा अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात एक नवा पॅटर्न निर्माण केला आहे. टँकरद्वारे थेट 'शुद्ध' (फिल्टर केलेले) पिण्याचे पाणी पुरवण्याचा अभिनव उपक्रम जिल्ह्यात राबवला जात असून, अशी कामगिरी करणारा अहिल्यानगर हा राज्यातील पहिलाच जिल्हा ठरला आहे. जिल्ह्यातील १३ प्रमुख प्रकल्पांपैकी महत्त्वाच्या

धरणांमधील २५ मे २०२६ अखेरची उपयुक्त पाणीसाठा स्थिती : मुळा धरणः १०,२६४ दलघफू (३९.४८ टक्के), आढळा धरणः ५०० दलघफू (४७.१७टक्के), सीना धरणः ९७१ दलघफू (४०.४५ टक्के), भंडारदरा धरणः ३,३७५ दलघफू (३०.५७ टक्के), निळवंडे धरणः २,०८४ दलघफू (२५०५ टक्के), घोड धरणः १,२८३ दलघफू (२१.४६ टक्के), भोजापूर धरणः ८ दलघफू (२.४४ टक्के). अधिक पाणीसाठा उपलब्ध असला, तरी वाढते तापमान आणि बाष्पीभवन लक्षात घेता जनतेने पाणी जपून वापरावे, असे आवाहन जलतज्ज्ञ हरिश्चंद्र चकोर यांनी केले आहे. १० वर्षांपूर्वी म्हणजेच २०१५-१६ मध्ये राज्यात तीव्र दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्या अनुभवातून धडा घेत जलसंपदा प्रशासनाने यंदा पाणी वापराचे आगाऊ नियोजन केले आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे.

# संपादकीय...

## पदवीधरांच्या स्वप्नांना बेरोजगारीची लागण

आजच्या काळात शिक्षण हे उज्ज्वल भविष्याचे दार उघडणारे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. प्रत्येक पालक आपल्या मुलाने मोठे शिक्षण घ्यावे, चांगली पदवी मिळवावी आणि सन्मानाची नोकरी करावी, अशी स्वप्ने पाहत असतो. तरुणही अनेक वर्षे मेहनत घेत, आर्थिक अडचणी सहन करत आणि स्पर्धेच्या प्रचंड ताणातून शिक्षण पूर्ण करतात. मात्र शिक्षण संपल्यानंतर वास्तवाचे चित्र अत्यंत भयावह दिसू लागते. हातात पदवी असते, ज्ञान असते, कौशल्य असते; पण योग्य नोकरी नसते. लाखो तरुण आज रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. अनेकजण आपल्या पात्रतेपेक्षा कमी दर्जाची कामे करत आहेत, तर काहींना अत्यल्प वेतनावर काम करावे लागत आहे. ही केवळ बेरोजगारीची समस्या नाही, तर वाढत्या अल्परोजगाराचीदेखील गंभीर सामाजिक आणि आर्थिक शोकांतिका आहे. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील वाढती दरी आता समाजासाठी चिंतेचा विषय बनली आहे. आज अनेक तरुण उच्च शिक्षण घेऊनही लहानसहान कामे करण्यास मजबूर आहेत. अभियंता, पदव्युत्तर, तांत्रिक शिक्षण घेतलेले विद्यार्थी अत्यल्प मानधनावर काम करताना दिसतात. काहीजण तात्पुरत्या नोकऱ्यांमध्ये अडकून पडले आहेत, तर काहींना कामच उपलब्ध होत नाही. ग्रामीण भागातील परिस्थिती तर आणखी गंभीर आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शहरांकडे धाव घेणाऱ्या तरुणांना अपेक्षित संधी मिळत नाहीत. त्यामुळे नैराश्य, मानसिक ताण आणि असुरक्षितता वाढताना दिसत आहे. अनेक कुटुंबांनी मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढलेले असते. मात्र शिक्षणानंतरही उत्पन्नाचे स्थिर साधन निर्माण होत नसल्याने संपूर्ण कुटुंब आर्थिक संकटात सापडते. आजची शिक्षण व्यवस्था मोठ्या प्रमाणावर प्रमाणपत्रे देत आहे; परंतु रोजगारक्षम कौशल्य निर्माण करण्यात ती अनेकदा अपुरी पडत आहे. पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्ष कामाच्या गरजा यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. उद्योग, सेवा आणि तंत्रज्ञान क्षेत्राला आवश्यक असलेली कौशल्ये आणि विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण यांचा ताळमेळ बसत नाही. परिणामी, शिक्षित तरुणांची संख्या वाढत असली तरी रोजगार मिळवणाऱ्यांची संख्या त्याच प्रमाणात वाढत नाही. दुसरीकडे, अनेक क्षेत्रांमध्ये कामाचे स्वरूप बदलत आहे. यंत्रणा आणि स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे पारंपरिक रोजगार कमी होत आहेत. अल्पकालीन करार, अस्थिर रोजगार आणि कमी वेतनाच्या संधी वाढत आहेत. त्यामुळे तरुणांना स्थिर भविष्याची हमी मिळत नाही. रोजगार नसल्याने केवळ आर्थिक अडचणी निर्माण होत नाहीत, तर सामाजिक परिणामही गंभीर स्वरूपाचे असतात. बेरोजगारीमुळे आत्मविश्वास कमी होतो, असंतोष वाढतो आणि समाजात अस्थिरतेचे वातावरण निर्माण होते. अनेक तरुण आपल्या क्षमतेनुसार काम करू शकत नसल्याने त्यांच्या प्रतिभेचा अपव्यय होत आहे. ही परिस्थिती कोणत्याही प्रगत समाजासाठी धोकादायक मानली जाते. शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्यापुरते मर्यादित न राहता रोजगारनिर्मितीशी जोडले गेले पाहिजे. कौशल्याधारित शिक्षण, उद्योगाभिमुख अभ्यासक्रम, स्थानिक गरजांशी संबंधित प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांना समान संधी मिळण्यासाठी ठोस धोरणांची गरज आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तरुणांना मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळाला, तर रोजगाराच्या अनेक नव्या वाटा खुल्या होऊ शकतात. आजची तरुण पिढी ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. मात्र हीच पिढी बेरोजगारी आणि अल्परोजगाराच्या विळख्यात अडकली, तर भविष्यात त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतील. त्यामुळे शिक्षण, कौशल्य आणि रोजगार यांच्यात सुसंगती निर्माण करणे ही काळाची सर्वात मोठी गरज बनली आहे. पदवी मिळाल्यानंतरही तरुणांना रोजगारासाठी भटकावे लागणे, ही कोणत्याही समाजासाठी अभिमानाची नव्हे तर आत्मपरीक्षणाची बाब आहे.


युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पाहिजेत

अकाऊंटंट | जागा ०२

टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे

आकर्षक पगार व इतर सुविधा

बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com

वाटचाल तीन दशकांची


# उंचखडक बु. शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

मागील वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू केला आणि प्रत्येक स्पर्धा परीक्षेत या शाळेने उत्तुंग भरारी घेतली. नवोदय विद्यालय, सैनिकी स्कूल, लक्षवेध, गणित-विज्ञान, सावित्रीबाई फुले अशा विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी शाळेचे नाव जिल्हा पातळीवर झळकविले. आता नुकताच शिष्यवृत्तीचा निकाल लागला. यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे १५ विद्यार्थी यशस्वी ठरले आहेत. त्यामुळे, तीन वर्षांपूर्वी बंद पडलेली शाळा आज राज्याच्या पटलावर गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून जात आहे. या गोष्टीचे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी कौतुक केले आहे. तसेच, गोविंद खोकले, रवि रुपवते, विक्रम गायकर, काळू तपासे आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ड. सागर शिंदे यांचे कौतुक केले आहे. तर, यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे. त्यात जिल्हा परिषद प्रा. शाळा उंचखडक बु. येथील १५ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. त्यात विराज बडे, निशिता बोराडे, वाकचौरे विराज, पवार ईश्वरी, शौर्य काकड, शिंदे स्वरा, खोकले सोहम, ईशिता बोराडे, शौर्यजीत वाकचौरे, नेहा मधे, सार्थकी सोनवणे, ईश्वरी कोरडे, सार्थक लहामटे, सुदर्शन म्हस्के, सानिध्य भोयर या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यातील निशिता बोऱ्हाडे आणि स्वरा शिंदे या दोन विद्यार्थीनी नवोदय विद्यालयास पात्र ठरल्या असून, १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. तसेच, सोहम खोकले आणि इशिता बोऱ्हाडे हे दोन विद्यार्थी सैनिकी स्कूलसाठी पात्र ठरले आहेत. हे यश फक्त एक वर्षातील असून, यासाठी गोविंद खोकले आणि बडे मॅडम यांनी गुणवत्ता कायम ठेवण्याचे काम केले आहे.

खरंतर, शासनाच्या शैक्षणिक उदासीन धोरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षक मिळू शकले नाहीत. तरीसुद्धा, शाळा व्यवस्थापन समितीने एम. ए. झालेल्या बडे मॅडम यांची खाजगी शिक्षक म्हणून मानधन तत्त्वावर नियुक्ती केली आणि त्यांनी विद्यार्थ्यांना सर्वोत्तम पद्धतीने शिकविण्याचे काम केले. त्यांच्या प्रयत्नाचे देखील हे फळ आहे. मात्र, या यशात गोविंद खोकले यांचा सिंहाचा वाटा आहे. तसेच, गटशिक्षण अधिकारी बाळासाहेब दोर्गे, रवि रुपवते, विक्रम गायकर, काळू तपासे, तत्कालीन गटशिक्षणाधिकारी आरविंद कुमावत, केंद्रप्रमुख सुनिल नरसाळे सर यांचे सर्वोत्तम मोलाचे सहकार्य लाभले आहे, अशी माहिती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ड. सागर शिंदे यांनी दिली.

# अँग्लो उर्दू विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

अँग्लो उर्दू हायस्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, संगमनेर या विद्यालयात इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२६ गुणपत्रक वाटप करण्यात आले.

इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२६ चे गुणपत्रक अँग्लो उर्दू हायस्कूल न्ड ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन श्री. शेख गनी हाजी सेठ, अंजुमन इस्लाम ट्रस्ट या संस्थेचे अध्यक्ष श्री. अब्दुल्ला हाजी हसन चौधरी, ट्रस्टी हाजी शेख एजाज शमशोद्दीन व उपस्थित असलेल्या पालकांचे हस्ते वाटप करण्यात आले.

इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२६ कला व विज्ञान शाखेत प्रथम पाच विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन त्यांचे सत्कार करण्यात आले. सदर कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

अँग्लो उर्दू हायस्कूल न्ड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य शेख मुनव्वर खलिलुरहेमान, पर्यवेक्षक रहमानी उबेदुर्रहमान कलीमउर्रहमान यांनी प्राप्त यशाचे श्रेय सर्व शिक्षक वर्गांना दिले व त्यांच्या कामाचे कौतुक केले.

## सोंगाड्या पद्मश्री ने....

रघुवीर खेडकर यांच्या या यशाबद्दल संगमनेरसह संपूर्ण महाराष्ट्रातील तमाशा आणि लोककला रसिकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या सन्मानामुळे संगमनेरच्या शिरपेचातही मानाचा तुरा रोवला गेला आहे. रघूवीर खेडकर यांना देशपातळीवर असा बहुमान मिळावा यासाठी पडद्यामागे अनेक हात झटत होते यात प्रामुख्याने ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संतोष खेडलेकर यांचे मोठे योगदान राहिले आहे.


**शुध्दीपत्रक क्र. १**
**(ई-निविदा सुचना क्र. ०३ सन २०२६-२७)**
**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र. पवि/लेशा/निविदा/१७५७, दि. ०५.०५.२०२६**

| कामाचे नांव :- | १ | Consultancy services for Feasibility Study cum DPR, Survey and Preparation of Land Plan including social, environmental and CC-mitigation study for widening to two lane with Paved Shoulders to various roads as per packages mentioned in Enclosure IV of TOR in the State of Maharashtra with financial aid of Multilateral Development Banks (Under EPC mode) Pacakge No. 1 to 9 |
|---|---|---|

| प्रसिद्ध झालेले | | सुधारित वाचावे | |
|---|---|---|---|
| E-Tender SubmissionDate and Time (Technical and Financial Bid) | Dated 22.05.2026 (Upto 15.00 Hrs.) | E-Tender Submission Time Date and (Technical and Financial Bid) | Dated 29.05.2026 (Upto 15.00 Hrs.) |
| Last Date of Submission of Hard Copy of Tender | Dated 25.05.2026 (Upto 15.00 Hrs.) | Last Date of Copy of Tender Submission of Hard | Dated 01.06.2026 (Upto 15.00 Hrs.) |
| E-Tender Opening Date | Dated 25.05.2026 at 15.00 Hrs. (if possible) inoffice of the Superintending Engineer, Raigad P.W. Circle, Konkan Bhavan | E-Tender Opening if Date | Dated 01.062026 at 15.00 Hrs. (if possible) in office of the Superintending Engineer, Raigad P.W. Circle, Konkan Bhavan |

(सदर निविदेसूचनेमध्ये अथवा निविदेत काही बदल होत असल्यास खालील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)
http://mahatenders.gov.in

जा.क्र. साबांवि/पनवेल/ई-निविदा/२०२६/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल



SUBSCRIBE TO DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

DAILY YUVAVARTA

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता



CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY OLD NAME REHANA DILAWAR SHAIKH

TO NEW NAME AS RIHANA DILAVAR SHAIKH

UIDAI 791834621953

ADD - A/P KURAN, TAL- SANGAMNER, DIST- AHILYANAGAR,422605


# बालगृहात दाखल 'कृष्णा' नावाच्या बालकाबाबत माहिती देण्याचे आवाहन

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

डिस्ट्रिक्ट प्रोबेशन अँड आफ्टर केअर असोसिएशन संचलित मुला-मुलांचे निरीक्षणगृह व बालगृह, अहिल्यानगर येथे दाखल करण्यात आलेल्या 'कृष्णा' नावाच्या बालकाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी आवाहन केले आहे.

संबंधित बालकाला श्रीगोंदा पोलीस स्टेशनमार्फत निरीक्षणगृहात दाखल करण्यात आले आहे. सदर बालक एका व्यक्तीसोबत भिक्षेकर अवस्थेत आढळून आला होता. या बालकावर हक्क सांगणारे माता-पिता, पालक किंवा अन्य नातेवाईकांनी तातडीने अधीक्षिका श्रीमती पौर्णिमा माने यांच्याशी ७०२०१२४७७१ अथवा बाल संरक्षण अधिकारी सर्जेराव शिरसाठ यांच्याशी ९९२१३०७३०२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# २८ मे रोजी 'निधी आपके निकट' कार्यक्रमाचे आयोजन

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

निवृत्तीवेतनधारक तसेच कंपनीचे नियोक्ते आणि प्रतिनिधी यांच्यासाठी 'निधी आपके निकट' हा विशेष कार्यक्रम गुरुवार, दि. २८ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे.

भविष्यनिर्वाह निधीशी संबंधित तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचणी असल्यास, आवश्यक कागदपत्रांसह कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेचे सहायक भविष्य निर्वाह निधी आयुक्त यांनी केले आहे.

# वसतिगृहांसाठी सैनिकांच्या पाल्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू

अहिल्यानगर (जिल्हा माहिती कार्यालय)-

जिल्ह्यातील अहिल्यानगर शहर, श्रीगोंदा व कोपरगाव येथील सैनिकांच्या मुला-मुलींच्या वसतिगृहांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, दि. ३० जून २०२६ पर्यंत प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

अहिल्यानगर येथे सैनिक मुलांचे व मुलींचे स्वतंत्र वसतिगृह नगर कॉलेजसमोर स्थित असून, श्रीगोंदा येथे शासकीय आरोग्य केंद्राशेजारी सैनिक मुलांचे वसतिगृह कार्यरत आहे. तसेच, कोपरगाव येथे खंडोबा मंदिराशेजारी सैनिक मुलांचे वसतिगृह सुरू आहे.

या वसतिगृहांमध्ये अंघोळीसाठी गरम पाणी, स्वतंत्र अभ्यासिका, विविध खेळांचे साहित्य तसेच सुसज्ज मैदान उपलब्ध आहे. वेळोवेळी जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही करण्यात येते. अधिक माहितीसाठी संबंधित वसतिगृहांच्या अधीक्षकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या वसतिगृहांमध्ये इयत्ता अकरावी ते पदव्युत्तर शिक्षण तसेच औद्योगिक प्रशिक्षण व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिक व सेवेत असलेल्या सैनिकांच्या पाल्यांना सवलतीच्या दरात प्रवेश दिला जाणार आहे. युद्धविधवा तसेच दिव्यांग सैनिकांच्या पाल्यांना विनामूल्य, प्राधान्याने प्रवेश देण्यात येणार आहे. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी दि. ०१ जुलै २०२६ रोजी प्रवेश निश्चितीसाठी उपस्थित राहावे, असेही कळविण्यात आले आहे.







पाहिजेत

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.

हेल्पर - ०१

संपर्क- नेहरु चौक, संगमनेर

9922113534
9730468090



पाहिजेत

मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे

प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर

9921245753



पाहिजेत

स्वयंपाकीन - ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर - ०१
क्लार्क - ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन - ०१

अनुभवास प्राधान्य

9822334431



पाहिजेत

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६















दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com














# एकल महिला स्वतंत्र धोरण करण्यासाठी समिती स्थापन



अकोले
(युवावार्ता प्रतिनिधी) -

एकल महिलांच्या प्रश्नांवर धोरण ठरवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मसुदा समिती नेमली आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र धोरण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य असणार आहे. या क्षेत्रातील एक कार्यकर्ता म्हणून खूष समाधान आहे. त्याबद्दल सरकारचे मनापासून अभिनंदन करत असल्याची भावना राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

या मसुदा समितीमध्ये 'सोऊ एकल महिला समिती'चे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांचा समावेश करण्यात आला आहे. यातून फक्त धोरणात्मक सूचना करता येतील. राज्य सरकारने महिला धोरण जाहीर केले तरीसुद्धा, या एकल महिलांची मोठी संख्या बघता स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती.

२०११ साली महाराष्ट्रात एकल महिलांची संख्या ५४ लाख होती. ती १५ वर्षांनंतर किमान ७० लाख असेल. त्यामुळे या महिलांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, ग्रामीण, शहरी असे सर्व प्रश्न बघता धोरणांची गरज होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या अर्थसंकल्पाच्या भाषणात एकल महिलांसाठी लवकरच धोरण जाहीर करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. त्या घोषणेच्या अंमलबजावणीची विनंती केल्यावर प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी एकल महिला प्रश्नांवर दोन बैठका घेतल्या व मसुदा समिती स्थापन करण्याचे महिला बालकल्याण आयुक्त विभागाला सूचित केले.

महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर या दोघींनीही त्यानंतर एकल महिला धोरण विषयावर चर्चा करण्यासाठी बैठका घेऊन समिती स्थापन केली. या समितीचे अध्यक्ष महिला बालकल्याण असून, राज्यातील सर्व विभागांचे अधिकारी या समितीत आहेत.

पूर्वी या विषयावर ज्यांनी काम केले किंवा करत आहेत, त्यांच्या सूचनाही महत्त्वाच्या ठरतील. त्या सर्वांशी आदरपूर्वक संपर्क करून त्यांच्या सूचना समजून घेतल्या जातील. एकल महिलांच्या अपेक्षा आणि भावना याचे प्रतिबिंब नक्कीच या धोरणात असेल, असेही हेरंब कुलकर्णी यांनी म्हटले आहे.

# खाणीतील स्फोटामुळे घराला तडे, न्यायाची मागणी




संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

तालुक्यातील पिंपळे परिसरात असणाऱ्या दगड खाणींमध्ये अवैध पध्दतीने ब्लास्टींग करून गौण खनिज उत्खनन सुरू असते. मात्र त्याचा त्रास आजूबाजूच्या घरांना, नागरीकांना सहन करावा लागतो. या स्फोटामुळे घरांना मोठमोठे तडे जात असून घरे कमकुवत होत आहे. त्यामुळे हे अवैध उत्खनन तात्काळ बंद करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

याबाबत ज्ञानेश्वर सोन्याबापू झाडगे यांनी ग्रामपंचायतला निवेदन देत खाणीतील या ब्लास्टमुळे आपल्या घराचे मोठे नुकसान झाल्याचे म्हटले आहे. रात्रीच्या वेळी परिसरातील खाणींमध्ये मोठमोठे ब्लास्ट केले जातात. परीणामी आमच्या घरांना तडे जात असून आमचा जीव देखील धोक्यात आला आहे. आमची पक्की घरे देखील कमकुवत बनली असून आमच्याच जागेत आम्हालाच रहाणे अवघड बनले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने यांचा बंदोबस्त करावा व आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.

# नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वेसाठी रघुवीर खेडकर यांचे अमित शाह यांना साकडे



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

मी लोककला क्षेत्रात कार्यरत असल्याने सातत्याने लोकांमध्ये वावरत असतो. त्यामुळे मी जनतेचा सांस्कृतिक प्रतिनिधी आहे, अशी माझी भावना आहे. याच भावनेतून मी माझ्या भागातून जाणाऱ्या नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्पाला पुन्हा मंजुरी द्यावी, यासाठी आपण रेल्वे मंत्रालयाशी बोलावे, असे निवेदन पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी (२५ मे) केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना दिल्ली येथे दिले.

आज (२५ मे) रघुवीर खेडकर यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यानंतर देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी पद्म पुरस्काराने सन्मानित मान्यवरांसमवेत स्नेहभोजन आणि गप्पांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात रघुवीर खेडकर यांनी अमित शाह यांना आपल्या गावातून जाणारा नाशिक-पुणे हायस्पीड प्रकल्प काही तांत्रिक कारणाने रद्द झाला आहे. या प्रकल्पाला पुन्हा मंजुरी देण्यासाठी आपण रेल्वे मंत्रालयाशी बोलून योग्य तोडगा काढावा, असे साकडे घातले.

याचबरोबर, महाराष्ट्रातील तमाशा कलाकारांपुढील प्रश्नाबाबतही त्यांनी अमित शाह यांना स्वतंत्र निवेदन दिले. यात ते म्हणाले, महाराष्ट्राची लोककला असलेल्या तमाशा कलाकारांवर वारंवार हल्ले होतात. काही मोजकी गावे सोडली, तर बहुतांश ठिकाणी पोलीस प्रशासनाचे तमाशाला अजिबात सहकार्य मिळत नाही.

ज्या ज्या वेळी पोलिसांची मदत घेण्याची वेळ येते, तेव्हा कुणाच्यातरी वशिल्याशिवाय पोलीस प्रशासन सहकार्य करत नाही. याबाबत आपण राज्य सरकारमार्फत पोलिसांना सक्त सूचना द्याव्यात, असेही खेडकर यांनी अमित शाह यांना सांगितले.

ही दोन्ही निवेदने देण्याच्या आपल्या भूमिकेबद्दल रघुवीर खेडकर यांनी सांगितले, मी संगमनेरचा जबाबदार नागरिक आहे आणि लोकांचा सांस्कृतिक प्रतिनिधीही आहे. आपल्या सर्वच लोकप्रतिनिधींनी मनापासून प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना माझीही साथ असावी, या भावनेतून मी हे निवेदन दिले.

आमच्या तमाशा व्यवसायातील जबाबदार घटक म्हणून आमच्या कलेपुढील प्रश्न मांडणे, हे माझे कर्तव्य आहे. या भावनेतून मी अमितभाई शाह यांना निवेदन दिले आहे. मला आशा आहे, ते माझ्या दोन्ही निवेदनांचा सकारात्मक विचार करतील, असेही खेडकर यांनी नमूद केले.









# जिल्ह्यात गेल्यावर्षीपेक्षा...

पान नं. ३ वरुन-

महाराष्ट्रात सध्या लहान, मध्यम व मोठी अशी एकूण ३,०२८ धरणे कार्यरत असून, २५ मेअखेर धरणांमध्ये सरासरी ३०.८० टक्के (४४५.४१४ टीएमसी) उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे ३ टक्क्यांनी (४३.७०५ टीएमसी) अधिक पाणीसाठा उपलब्ध आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर कोणतीही टंचाई भासू नये म्हणून ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पिण्याच्या पाण्याचे पाण्याचे आरक्षण सुनिश्चित करण्याचे आदेश जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिले आहेत. जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून राज्यात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# युद्धविरामादरम्यान अमेरिकेचा इराणवर हल्ला

नवी दिल्ली (वार्ताहर)-

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या शस्त्रसंधी वाटाघाटीदरम्यान, अमेरिकेच्या सैन्याने होर्मुज सामुद्रधुनीजवळ इराणी क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळे आणि सुरुंग पेरणाऱ्या बोटींना लक्ष्य केले. अमेरिकेच्या सेंट्रल कमांड (सेंटकॉम) नुसार, ही कारवाई सेल्फ-डिफेन्स, म्हणजेच आत्मसंरक्षणासाठी करण्यात आली. सेंटकॉमचे प्रवक्ते टिमोथी हॉकिन्स म्हणाले की, अमेरिकन सैनिक आणि युद्धनौकांना धोक्यापासून वाचवण्यासाठी हे हल्ले करण्यात आले. तथापि, त्यांनी असेही सांगितले की, शस्त्रसंधीदरम्यान अमेरिका संयम बाळगत आहे. होर्मुज सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी व्यापार मार्गांपैकी एक मानली जाते. याच मार्गातून मोठ्या प्रमाणात तेलाचा पुरवठा होतो.

















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com


तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264

RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25






# पेट्रोल-डिझेल टंचाईचे संकट गडद

## लांबच लांब रांगा, शेतकरी व नागरिक हैराण


एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -संगमनेरसह अकोले आणि राज्यातील अनेक भागांमध्ये पेट्रोल व डिझेल टंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्गाला त्याचा मोठा फटका बसू लागला आहे. अनेक पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. इंधन भरण्यासाठी नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असून या परिस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत होण्याची चिन्हे दिसत आहेत.

सध्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतीपूर्व मशागतीची कामे वेगाने सुरू आहेत. ट्रॅक्टर, पंपसेट आणि विविध कृषी यंत्रांसाठी मोठ्या प्रमाणावर डिझेलची गरज असते. मात्र पुरेसा इंधन पुरवठा होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांची शेतीची कामे अर्धवट राहिली असून नियोजनावर परिणाम होत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

याशिवाय खत, बियाणे आणि कीटकनाशकांच्या वाहतुकीवरही टंचाईचा परिणाम दिसून येत आहे. पुरवठा साखळी विस्कळीत होत असल्याने व्यापारी वर्गही अडचणीत सापडला आहे. येत्या काही दिवसांत मान्सून सक्रिय होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असल्याने वेळेत मशागत न झाल्यास खरीप पेरणी उशिरा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा साठा पूर्णपणे संपल्याची माहिती समोर येत आहे. आधीच सातत्याने वाढणाऱ्या इंधन दरांमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच आता पुरवठा सुरळीत नसल्याने नागरिकांच्या समस्यांमध्ये आणखी भर पडली आहे.

विशेष म्हणजे, सरकारकडून इंधनाचा कोणताही तुटवडा नसल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळी दिसून येत आहे. पेट्रोल पंपांवरील वाढत्या रांगा आणि उपलब्धतेतील अनिश्चितता यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजी वाढत आहे.

याच दरम्यान काही भागांत डिझेलच्या काळाबाजाराचीही चर्चा रंगू लागली आहे. रात्रीच्या वेळी काही ठिकाणी टेम्पोमधून ड्रम भरून ग्रामीण भागात डिझेलची अवैध विक्री होत असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. प्रशासनाने या चर्चांची गंभीर दखल घेत चौकशी करून आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

इंधन पुरवठा तातडीने सुरळीत झाला नाही तर त्याचा थेट परिणाम शेती, वाहतूक, बाजारपेठ आणि सर्वसामान्य जनजीवनावर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# वाळू तस्करांना तहसीलदारांची नोटीस

## 'मुळा'तील वाळू उपशाला प्रशासन लगाम लावणार


एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

घारगाव - संगमनेर तालुक्यातील साकुर पठार भागातील तसेच पारनेर तालुक्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या मुळा पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहे. ग्रामस्थ सहदेव जाधव यांनी वाळू तस्करावर कार्यवाही करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. पारनेर तहसीलदार गायत्री सैदाणे यांनी स्थानिक चौकशीवरून, पारनेर व संगमनेर तालुक्यातील एकूण सतरा लोकांना नोटीस काढल्या आहेत. मंगळवार दि. २६ मे रोजी पारनेर तहसील कार्यालयातील न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

जाधव यांचे तक्रारीनूसार देसवडे, मांडवे खुर्द, खडकवाडी, शिक्री, नागापूर, मोरेवाडी, नांदूर, संगमनेर या गावच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात रात्रीच्या वेळी जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा करून, रात्रीच मोठ्या डम्पर, ट्रॅक्टरच्या सहाय्याने देसवडे ते खडकवाडी, पोखरी, काळेवाडी इ. ठिकाणी वाहतूक केली जाते. वाळूने भरलेल्या गाड्या अडविल्या असता स्थानिक नागरिकांना जिवे मारण्याची धमकी दिली जाते, असेही तक्रारीत नमूद आहे.

पारनेर तहसीलदार गायत्री सैदाणे यांनी स्थानिक चौकशीवरुन ओंकार बोहुडे, विशाल तळेकर, राहुल गुंड, अमोल आल्हाट, ज्ञानदेव खेमनर, नामदेव खेमनर, ओंकार खेमनर, अमोल म्हस्के, रोहित साळवे, संदिप दाते, उल्हास दरेकर, अक्षय भांबरे, शांताराम दरेकर, सुनिल चव्हाण, विक्रम सागर, पाडुरंग गागरे, गणेश शिरतार यांची वाहने या पूर्वी वाळू तस्करी करताना पकडलेली आहेत. अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकी बाबत दंड देखील वसुल करणेत आलेला आहे. यावरुन त्यांचा अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीस सहभाग असल्याचे पारनेर तहसीलदार यांचे निदर्शनास आले आहे. पुढील प्रतिबंधात्मक कार्यवाही करणेस पुरेसे कारण असल्याचे पारनेर तहसीलदार यांनी नोटीसीमध्ये मत व्यक्त केले आहे. यावर संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची सुनावणी घेऊन संधी दिली जाणार आहे.

# बेकरीवर छापा, ३२ हजार रुपयांचे पाव, बटर, टोस्ट, खारी जप्त



एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

बोटा - सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासनाने संगमनेर तालुक्यातील बोटा येथील गोल्डन बेकरीवर सोमवारी सकाळी छापा टाकला. या कारवाईत बेकरीमधील अस्वच्छता आणि नियमांचे उल्लंघन उघडकीस आले असून, प्रशासनाने तब्बल ३२,२८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बोटा. येथील गोल्डन बेकरीमध्ये अत्यंत अस्वच्छ वातावरणात खाद्यपदार्थ तयार केले जात असल्याचा व्हिडीओ रविवारी सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. याबाबतची तक्रारही स्थानिक ग्रामस्थांनी अन्न आणि औषध प्रशासनाला केली होती. या व्हिडीओमध्ये बेकरीत घाणीचे साम्राज्य आणि माशांचा प्रचंड सुळसुळाट असल्याचे दिसून आले होते. या व्हिडीओमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

संबंधित व्हायरल व्हिडीओ अन्न आणि औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना मिळाला असता अहिल्यानगर अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त

सोपान इंगळे आणि अन्न औषध अधिकारी प्रदीप पवार यांच्या पथकाने तातडीने सोमवारी या बेकरीवर छापा टाकला. प्रत्यक्ष पाहणीत बेकरीमध्ये अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या कलम २६, २७ आणि २३ चे सर्रास उल्लंघन होत असल्याचे पथकाला आढळून आले.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी कायद्याच्या कलम ३८ अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करत, घटनास्थळावरून पंच आणि साक्षीदार यांच्या उपस्थितीत फ्रुटी टोस्ट (गोल्डन), जिरा बटर (गोल्डन), ज़िरा खारी (गोल्डन) असा ३२ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सीलबंद केला. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा व्यावसायिकांवर यापुढेही कडक कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाने दिला आहे.

# केंद्रीय मंत्र्याच्या मुलावर पॉक्सो

## अल्पवयीन मुलीवर मंत्र्यांच्या मुलासह पाच जणांचा अत्याचार

हैदराबाद (वृत्तसंस्था)

१७ वर्षांच्या मुलीने आणि तिच्या मित्रांनी मिळून नवीन वर्षाची पार्टी ठेवली. ३१ डिसेंबर २०२५ च्या रात्री एका फार्महाऊसवर जल्लोष सुरू झाला. अल्पवयीन मुलीसोबत एक मुलगी आणि ५ मुले होती. यांमध्ये केंद्रीय गृह राज्यमंत्री बंडी संजय कुमार यांचा २५ वर्षांचा मुलगा साई भागीरथ देखील होता.

आरोप आहे की, पार्टीदरम्यान भागीरथने अल्पवयीन मुलीवर दारू पिण्यासाठी दबाव आणला. त्यानंतर तो तिच्याशी छेडछाड करू लागला. भागीरथ दारूच्या नशेत धुंद होता. त्याने मुलीला आधी चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला, नंतर शारीरिक संबंध ठेवण्यासाठी प्रवृत्त करू लागला. मुलगी एकटी पडली, त्यामुळे ती विरोध करू शकली नाही. घटनेनंतर मुलीने आईला घडलेला प्रकार सांगितला. कुटुंबाने तक्रार करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांच्यावर गुन्हा दाखल न करण्यासाठी दबाव आणण्यात आला.

सुमारे ४ महिन्यांनंतर ८ मे रोजी आईच्या तक्रारीवरून भागीरथविरुद्ध पॉक्सोचा गुन्हा दाखल झाला. भागीरथला अटक करण्यात आली आहे. या अटकेनंतर या प्रकरणात आरएसएसलाही ओढण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावर संघाने निवेदन जारी करून सांगितले की, हे पूर्णपणे भाजपचे अंतर्गत प्रकरण आहे, याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. पेट बशीराबाद पोलीस स्टेशन हैदराबाद शहरापासून १५ किलोमीटर दूर आहे. याच पोलीस ठाण्यात पॉक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुरक्षेच्या दृष्टीने पीडित कुटुंब सध्या पोलिसांच्या निगराणीखाली आहे.

पीडितेच्या नातेवाईकाने आम्हाला एआयडीएसओ म्हणजेच ऑल इंडिया स्टुडंट डेमोक्रॅटिक असोसिएशनचा नंबर दिला. ही संस्था पीडितेची कायदेशीर लढाई लढत आहे आणि तिच्यासाठी निदर्शने करत आहे. एआयडीएसओ मधील कायदेशीर टीमची सदस्य वैशालीने आम्हाला प्रकरणाशी संबंधित कायदेशीर कागदपत्रे दिली. यात पीडितेच्या आईचे जबाब आणि महत्त्वाची माहिती समाविष्ट आहे. पीडितेच्या आईने तक्रारीत सांगितले की, 'जून २०२५ च्या सुमारास माझ्या मुलीची भागीरथशी ओळख झाली. त्यानंतर इंस्टाग्राम आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून दोघांमध्ये मैत्री वाढली. भागीरथने माझ्या मुलीला सज्ञान झाल्यावर लग्न करण्याचे खोटे आश्वासन दिले आणि तिला आपल्या जाळ्यात ओढले. तिचा विश्वास जिंकल्यानंतर भागीरथ तिला भावनिकरित्या ब्लॅकमेल करू लागला. एवढेच नाही तर तो तिच्या शिक्षण आणि करिअरशी संबंधित निर्णयांवरही बंधने घालू लागला.

# जिल्हा परिषदेच्या १४४ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्यांची प्रक्रिया सोमवारपासून राबविण्यात आली. जिल्ह्यातील १४४ कर्मचाऱ्यांच्या इतर विभागांत बदल्या करण्यात आल्या असून, दोन कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत आक्षेप घेण्यात आला. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेच्या सभागृहात सोमवारी सकाळी बदल्याची प्रक्रिया सुरू झाली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, आदी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या कृषी, पशुसंवर्धन, ग्रामीण पाणी पुरवठा आणि आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. प्रशासकीय २६, कर्मचाऱ्यांची पेसा अंतर्गत ४२, विनंती २६ आणि १९ कर्मचाऱ्यांच्या आपसी बदल्या झाल्या.

जनगणनेच्या कामामुळे बदल्यांची प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. त्यानंतर केवळ तीन विभागांतील कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणार होत्या. मात्र, विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यामुळे बदल्यांना स्थगिती देण्यात आली होती. विधान परिषदेसाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रवर्गातून मतदार नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया राबविण्यास परवानगी देण्यात आली. शासनाकडून बदल्या करण्यास परवानगी मिळाल्याने जिल्हा परिषदेने बदल्यांची प्रक्रिया राबविली असून, जूनपूर्वीच कर्मचाऱ्यांना नियुक्ती मिळणार आहे. या बदल्यांमध्ये कृषी विभागात १, पशुसंवर्धन विभाग १७, आरोग्यसेवक महिला ४३, आरोग्यसेवक पुरुष ४२, आरोग्य पर्यवेक्षक १, आरोग्य सहायक पुरुष २०, आरोग्य सहायक महिला ९, औषध निर्माण अधिकारी १०, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी १ यांचा समावेश आहे.

